

दैनिक
डोंगरचा राजा
www.dongarcharaja.com
email:dongarcharaja@gmail.com
संपादक–अनिल वाघमारे Editor-Anil waghmare



बीड (महाराष्ट्र) वर्ष १ ले अंक–१४४ शुक्रवार दि.२७ नोव्हेंबर २०२६ पोस्टल परवाना: L SB/BEED/RNP-278/2026-2028 RNI No. MHMAR/25/A4406 किंमत २ रु. पाने – ४

BEED (Maharashtra) Vol: 1 Issue:144 Date: FRIDAY 27 november 2026 Postal Permission: L SB/BEED/RNP-278/2026-2028 RNI No. MHMAR/25/A4406 Rs. 2/- Pages : 4

३० नोव्हेंबर रोजी लोकसभा, तर २ डिसेंबरला राज्यसभेचे अधिवेशन

मतदारसंघ पुनर्रचना आणि महिला आरक्षण विधेयकासाठी सरकारकडून मोठ्या हालचाली

नवी दिल्ली। प्रतिनिधी

केंद्र सरकारने लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभेच्या सभापतींना संसदेच्या दोन्ही सभागृहांची बैठक पुन्हा बोलवण्याची विनंती केली आहे. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यास लोकसभेचे कामकाज ३० नोव्हेंबर २०२६ पासून आणि राज्यसभेचे कामकाज २ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. तर ३ डिसेंबर रोजी दोन्ही सभागृहांची कार्यवाही समाप्त होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत स्पष्ट केले की, हे कामकाज संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या कार्यवाहीचाच एक भाग असेल. मात्र, हा कार्यक्रम सभागृहाच्या कामकाजाच्या गरजांवर अवलंबून राहणार आहे.

या घोषणेनंतर काँग्रेसने आगामी संसदीय बैठकीसाठी आपली रणनीती ठरवण्यासाठी शुक्रवारी सायंकाळी ४.३० वाजता दिल्लीत संसदीय समितीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत संभाव्य अधिवेशनासंदर्भात पक्षाची भूमिका आणि तयारीवर सखोल चर्चा केली जाणार आहे.

संसदेची ही प्रस्तावित बैठक अशा वेळी होत आहे, जेव्हा सरकारच्या मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर आणि महिला आरक्षण लागू करण्यावरून जोरदार चर्चा आणि वाद सुरू आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या



अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतही या विषयावर चर्चा झाली असून, पंतप्रधानांनी मंत्र्यांना आगामी संसदीय बैठकीसाठी सज्ज राहण्याच्या सूचना दिल्याचे समजते.

महिला आरक्षणाला निवडणूक मतदारसंघांच्या पुनर्रचनेशी जोडणारे संविधान दुरुस्ती विधेयक यंदा १७ एप्रिल रोजी झालेल्या विशेष सत्रात लोकसभेत मंजूर होऊ शकले नव्हते. त्यावेळी या विधेयकाला आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत मिळू शकले नव्हते. हे विधेयक मंजूर न झाल्यापासूनच देशात मतदारसंघ पुनर्रचना प्रक्रियेबाबत आणि लोकसभेच्या जागा वाढवण्याबाबत चर्चा तीव्र झाली आहे.

मतदारसंघ पुनर्रचनेवरुन सुरू असलेल्या चर्चेत असा एक संभाव्य प्रस्तावही पुढे आला आहे की, राज्यांमध्ये १९७१ च्या जनगणनेच्या आधारे सध्याच्या जागांचा हिस्सा कायम ठेवत लोकसभेच्या एकूण जागांमध्ये ५०

▶▶पान २ वर

'आरोपींना सोडणार नाही, पुणेकरांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड नाही'; पोलिसाना कठोर कारवाईच्या सूचना

कोर्टाबाहेरील गोळीबारानंतर सुनेत्रा पवारांचा कडक इशारा!

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील शिवाजीनगर जिल्हा न्यायालयाच्या प्रवेशद्वार क्रमांक ४ बाहेर भरदिवसा झालेल्या गोळीबार आणि कोयत्याने हल्ल्याच्या घटनेने संपूर्ण शहरात खळबळ उडाली आहे. न्यायालयासारख्या अतिसंवेदनशील परिसरातच अशा प्रकारचा जीवघेणा हल्ला झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेची उपमुख्यमंत्री तथा पुण्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांनी गंभीर दखल घेत



'आरोपींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाणार नाही. पुणेकरांच्या सुरक्षिततेशी कोणतीही तडजोड केली जाणार नाही,' असा स्पष्ट इशारा दिला आहे.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांना कडक निर्देश

शिवाजीनगर न्यायालयाबाहेर घडलेली गोळीबार आणि कोयत्याने हल्ल्याची घटना अत्यंत दुर्दैवी व गंभीर असल्याचे सुनेत्रा पवार यांनी म्हटले आहे. या प्रकरणातील आरोपींचा

▶▶पान २ वर

तलाठी विलास तपसे हल्ल्याचा महसूल संघटनांकडून निषेध

३० तारखेपासून कामबंद आंदोलनाचा इशारा



बीड दि.२६(प्रतिनिधी) : आहेर चिंचोली येथील तलाठी विलास तपसे यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा बीड तालुक्यातील तलाठी, मंडळ अधिकारी तसेच महसूल विभागातील विविध कर्मचारी संघटनांच्या वतीने निषेध करुन याप्रकरणी दोषींवर कारवाई करावी अन्यथा

▶▶पान २ वर

नगरपंचायतीच्या अत्याधुनिक टोलेजंग इमारतीने वडवणीच्या विकासाला नविन साज

शनिवारी आ.प्रकाशदादा सोळंके यांच्या हस्ते उदघाटन सोहळा; साडे सहा कोटींच्या निधीपासून वास्तूपर्यंतचा विकासप्रवास यशस्वी

वडवणी,दि.२६(प्रतिनिधी):- वडवणी शहराच्या विकासप्रवासात मानाचा तुरा रोवणारा आणि नगरपंचायतीच्या प्रशासकीय वाटचालीला नवी दिशा देणारा महत्त्वपूर्ण क्षण आता जवळ आला आहे. तब्बल ६ कोटी ३० लाख रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या वडवणी नगरपंचायतीच्या भव्य व नूतन प्रशासकीय इमारतीचा उदघाटन सोहळा विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उद्या शनिवार,दि. २८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता संपन्न होणार आहे. महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या माध्यमातून उपलब्ध झालेला निधी, माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकासप्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे प्रयत्न आणि शेषेराव बाप्पु जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे साकारलेल्या व शहराच्या वैभवात मैलाचा दगड ठरेल अशा या नेत्रदिपक अशा प्रशासकीय वास्तूचे लोकार्पण आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या शुभहस्ते होणार आहे. त्यामुळे वडवणी शहराच्या विकासाच्या इतिहासात हा सोहळा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरणार आहे.

वडवणी नगरपंचायतीच्या नूतन प्रशासकीय इमारतीच्या उभारणीसाठी सुरुवातीला दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून आणि आमदार प्रकाशदादा सोळंके यांच्या विशेष प्रयत्नांतून





तब्बल ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. या निधीमुळे इमारतीच्या बांधकामाला गती मिळाली. मात्र, प्रशासकीय इमारतीचे उर्वरित काम पूर्ण करण्यासाठी आणखी निधीची आवश्यकता निर्माण झाली होती. ही बाब लक्षात घेवून नगरपंचायतीचे माजी गटनेते शेषेराव बाप्पु जगताप यांनी अतिरिक्त निधीसाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या मागणीची दखल घेत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून आणखी १ कोटी ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला. अशा प्रकारे एकूण ६ कोटी ३० लाख रुपयांच्या भरीव निधीतून वडवणी नगरपंचायतीची ही भव्य, आकर्षक आणि सुसज्ज प्रशासकीय इमारत उभी राहिली आहे. केवळ एक प्रशासकीय इमारत म्हणून नव्हे, तर शहराच्या विकासाची दूरदृष्टी, लोकप्रतिनिधींचे प्रयत्न आणि स्थानिक पातळीवरील पाठपुराव्याचे फलित म्हणून या वास्तूकडे पाहिले जात आहे. अनेक वर्षांपासून अपेक्षित असलेल्या सुसज्ज प्रशासकीय सुविधांना या इमारतीच्या माध्यमातून नवे बळ मिळणार आहे. या उदघाटन सोहळ्याचे उदघाटक म्हणून माजी मंत्री तथा माजलगांव विधानसभा मतदारसंघाचे विकास प्रिय आमदार प्रकाशदादा सोळंके उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे विशेष अतिथी म्हणून बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन उपस्थित राहणार असून, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वडवणीच्या नगराध्यक्षा वंदनाताई शेषेराव जगताप असणार आहेत. व प्रमुख उपस्थितीमध्ये नगरपंचायत प्रशासन बीडचे सहाय्यक आयुक्त संभाजी वाघमारे यांची उपस्थिती राहणार आहे. याशिवाय माजी जिल्हा परिषद सभापती जयसिंग भैय्या सोळंके, माजी नगराध्यक्ष राजाभाऊ आण्णा मुंडे, माजलगांवचे नगराध्यक्ष सहाल भैय्या चाऊस, धारुरचे नगराध्यक्ष बालासाहेब जाधव, कृषी उत्पन्न बाजार समिती वडवणीचे सभापती संभाजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, उपनगराध्यक्ष बन्सीभाऊ मुंडे, माजी जिल्हा परिषद सदस्य सर्जेराव आळणे, माजी जिल्हा परिषद सदस्य

▶▶पान २ वर

नागरिकांच्या सेवेसाठी आधुनिक प्रशासकीय केंद्र!

नगरपंचायतीची ही नूतन इमारत शहराच्या प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. नागरिकांना विविध शासकीय कामांसाठी, नागरी सुविधांसाठी आणि प्रशासकीय सेवांसाठी एकाच ठिकाणी अत्याधुनिक सुसूत्र व सोयीस्कर व्यवस्था उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी या इमारतीची भूमिका महत्त्वाची ठरेल. नागरिक आणि प्रशासन यांच्यातील समन्वय अधिक प्रभावी होवून शहराच्या विकासकामांना नवी गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

वडवणीच्या विकासाच्या इतिहासातील महत्त्वाचा दिवस!

एकूणच, ६ कोटी ३० लाख रुपयांच्या निधीतून साकारलेली ही भव्य प्रशासकीय इमारत म्हणजे वडवणी शहराच्या विकासाची नवी ओळख ठरणार आहे. दिवंगत अजितदादा पवार यांच्या माध्यमातून मिळालेला निधी, आमदार प्रकाशदादा सोळंके यांचे प्रयत्न आणि शेषेराव बाप्पु जगताप यांचा अतिरिक्त निधीसाठीचा पाठपुरावा या सर्वांच्या योगदानातून ही वास्तू प्रत्यक्षात साकारली आहे. त्यामुळे या उदघाटन सोहळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

दुष्काळात नगरपंचायत उद्घाटनाचा लाखोंचा थाट कशासाठी? जनतेच्या पैशाचा अपव्यय थांबवा!

नगरपंचायत कार्यालयाचा उद्घाटन सोहळा साधेपणाने करण्याची नगरसेवक टकले,राठोड,ढोले यांची मागणी; मुख्याधिकाऱ्यांना निवेदन



वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरासह परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली असताना नागरिकांसमोर पाणीटंचाई, शेतीचे प्रश्न आणि विविध नागरी समस्यांचे गंभीर आव्हान उभे आहे. अशा परिस्थितीत नगरपंचायत कार्यालयाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी लाखो रुपयांचा खर्च करून मोठ्या थाटामाटात कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन कशासाठी? जनतेकडून विविध करांची सक्तीने वसुली केली जात असताना त्याच जनतेच्या पैशाचा अशा पद्धतीने खर्च करणे कितपत योग्य आहे, असा सवाल नगरसेवक गिण्यानदेव राठोड,नगरसेवक हरिदास टकले,नगरसेवक मीरा सुधीर ढोले यांच्यासह त्यांच्या सहकारी नगरसेवकांनी उपस्थित केला आहे.

नगरपंचायत कार्यालयाचा उद्घाटन सोहळा सध्याच्या दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अत्यंत साध्या पद्धतीने पार पाडावा, अशी मागणी संबंधित नगरसेवकांनी मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

लोकभावनेचा आदर करून उद्घाटन साधेपणाने करा!

सध्याची दुष्काळी परिस्थिती पाहता उद्घाटन सोहळा मोठ्या थाटामाटात करण्याऐवजी अत्यंत साध्या पद्धतीने पार पाडावा. जनतेच्या पैशाचा अनावश्यक खर्च टाळून तो निधी शहरातील पाणीप्रश्न, नागरी सुविधा आणि इतर विकासकामांसाठी वापरण्याला प्राधान्य द्यावे, अशी भूमिका नगरसेवकांनी मांडली आहे.

'दुष्काळात तेरावा' करण्याऐवजी नागरिकांच्या भावनांचा आणि परिस्थितीचा विचार करून प्रशासनाने निर्णय घ्यावा. जनतेच्या पैशाचा अपव्यय टाळावा आणि उद्घाटन सोहळा साधेपणाने पार पाडावा, अशी ठाम मागणी नगरसेवक सौ. मीरा सुधीर ढोले, नगरसेवक गिण्यानदेव राठोड, नगरसेवक हरिदास टकले व त्यांच्या सहकारी नगरसेवकांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

आता या मागणीवर नगरपंचायत प्रशासन काय भूमिका घेते आणि उद्घाटन सोहळ्याच्या खर्चाबाबत काय निर्णय घेते, याकडे वडवणीकर नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दुष्काळात नागरिकांचे प्रश्न महत्त्वाचे की उद्घाटनाचा थाट?

सध्या वडवणी शहर आणि परिसरातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. विशेषतः पाणीप्रश्न गंभीर बनत असताना नागरिकांच्या मूलभूत गरजांना प्राधान्य देणे अपेक्षित आहे. एका बाजूला सर्वसामान्य नागरिकांकडून कर वसुली आणि विविध शुल्कांची वसुली केली जाते, तर दुसऱ्या बाजूला सार्वजनिक निधीतून मोठ्या खर्चाचे कार्यक्रम आयोजित करण्याचे नियोजन केले जात असल्याचा आक्षेप नगरसेवकांनी घेतला आहे.

जिल्हाधिकारी यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी संबंधित ठिकाणी भेटी देऊन पाहणी केली असतानाही दुष्काळी परिस्थिती आणि नागरिकांच्या अडचणींचे गांभीर्य लक्षात घेऊन खर्चाला मर्यादा घालण्याची आवश्यकता असल्याचे मत नगरसेवकांनी व्यक्त केले आहे.

नगरपंचायत कार्यालयाचे उद्घाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले असते, तर शहरातील नागरिकांच्या विविध समस्या, प्रलंबित विकासकामे आणि महत्त्वपूर्ण मागण्या थेट पालकमंत्र्यांसमोर मांडण्याची संधी मिळाली असती. शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या निधीच्या मागण्या आणि नागरी सुविधांचे प्रश्न यावर सकारात्मक चर्चा होण्याची अपेक्षा होती. मात्र, अशा प्रकारची संधी उपलब्ध नसताना केवळ उद्घाटन सोहळ्यासाठी मोठा खर्च करण्याची गरज काय, असा प्रश्नही नगरसेवकांनी उपस्थित केला आहे.

दर्शनाच्या बहाण्याने चोरी? साई मंदिरातील घटना सीसीटीव्हीत कैद

परळी वैजनाथ / प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथांच्या पवित्र नगरीपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या चांदापूर येथील श्री डोंगर तुकाई परिसरातील भव्य श्री साईबाबा मंदिरात चोरीचा प्रकार घडल्याची घटना समोर आली आहे. मंदिरात दर्शनासाठी आलेल्या एका अज्ञात व्यक्तीने चोरी केल्याचा प्रकार मंदिरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. या घटनेमुळे परिसरातील साईभक्तांमध्ये चिंता व्यक्त होत असून, मंदिरातील चोरी करणाऱ्या आरोपीचा शोध घेऊन पोलिसांनी त्याच्या मुसक्या आवळाव्यात, अशी मागणी मंदिराचे विश्वस्त व पुजारी यांनी केली आहे.



साईभक्त तथा उद्योजक मा.रवींद्र पापा गित्ते सेठ व परळी वैजनाथ नगर परिषद पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र (पापा) गित्ते यांनी चांदापूर येथील श्री डोंगर तुकाई परिसरात साईभक्तांच्या श्रद्धा आणि सेवाभावातून श्री साईबाबांचे भव्य व दिव्य मंदिर उभारण्यात आले आहे. 'साईची कृपा आणि निष्ठेचा सुंदर संगम' अशी ओळख निर्माण करणारे हे मंदिर म्हणजे परळी परिसरातील प्रति शिर्डी म्हणून भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले आहे. दररोज मोठ्या संख्येने भाविक येथे साईबाबांच्या दर्शनासाठी येतात. परळी शहरासह पंचक्रोशीतील साईभक्तांना या मंदिराच्या माध्यमातून एक नवीन श्रद्धास्थान उपलब्ध झाले आहे.

मात्र, ज्या मंदिरात भाविक श्रद्धेने नतमस्तक होतात, त्याच मंदिरात चोरीचा प्रकार घडल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. चुकीच्या मार्गाने पैसे मिळविण्यासाठी काही व्यक्ती कोणत्या थराला जातील, याचा अंदाज बांधणेही कठीण झाले आहे. दर्शनाच्या निमित्ताने मंदिरात आलेल्या अज्ञात व्यक्तीकडून चोरी झाल्याचा प्रकार सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाल्याने या घटनेचे गांभीर्य वाढले आहे. मंदिरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संबंधित व्यक्तीचा शोध घेऊन योग्य ती कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

ग्रामीण पोलिसांनी गस्त वाढवावी परळी वैजनाथ ते चांदापूर मार्गे घाटनांदूरकडे जाणारा रस्ता असल्याने या परिसरात नागरिकांची व वाहनांची नियमित वर्दळ असते. मंदिरात दररोज भाविकांची ये-जा सुरू असते. त्यामुळे मंदिर परिसरासह चांदापूर मार्गावर ग्रामीण पोलिसांनी नियमित गस्त वाढवावी. तसेच अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी विशेष लक्ष द्यावे, अशी मागणी मंदिराचे विश्वस्त व पुजारी यांनी केली आहे.

श्रद्धा आणि भक्तीचे केंद्र असलेल्या श्री साईबाबा मंदिरात घडलेल्या या चोरीच्या प्रकाराची पोलिसांनी गांभीर्याने दखल घेऊन सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपीचा शोध घ्यावा आणि भाविकांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा साईभक्तांकडून व्यक्त होत आहे.

महाराणी ताराबाई शाळेत संविधान दिन साजरा



वडवणी। प्रतिनिधी

संस्कार शिक्षण मंडळ,वडवणी संचलित महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय वडवणी येथे,गुरुवार दि. २६ नोव्हेंबर २०२६ रोजी भारतीय संविधान दिन उत्साहात साजरा.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुनीलजी कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे तसेच दिनेशजी घोळवे सर ,ए.बी.मुंडे सर ,श्रीमती कुंडगीर मॅडम,प्राध्यापिका उघडे मॅडम या मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

भारतीय संविधान उद्देशिकेचे सामूहिक वाचन केल्यानंतर संचालक इंजि.अशोक भैय्या आंधळे तसेच ए.बी. मुंडे , कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील कुलकर्णी यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे संविधान निर्मितीतील योगदान बद्दल विचार व्यक्त करून भारतीय संविधान दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीमती कुंडगीर मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गंगाभिष्म अंडील यांनी केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घ्या-अशोक लोढा

चौसाळा/ प्रतिनिधी

राज्यातील शेतकरी, पशुपालक, ग्रामीण महिला तसेच बेरोजगार युवक-युवतींना पशुपालनाच्या माध्यमातून स्वयंरोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागामार्फत 'मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेसाठी दि. २६ नोव्हेंबर पासून ऑनलाइन अर्ज प्रक्रिया सुरू होत असून, बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकरी, पशुपालक आणि युवक-युवतींनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जि. सदस्य तथा भारतीय जनता पार्टीचे बीड शहराध्यक्ष अशोक चांदमल लोढा यांनी केले आहे. राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून ग्रामीण भागातील पशुपालन व्यवसायाला आधुनिक स्वरूप देण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणे, ग्रामीण भागातील बेरोजगारी कमी करणे, शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे अतिरिक्त स्रोत निर्माण करणे आणि पशुधनावर आधारित उद्योगांना चालना देणे, या उद्देशाने ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या योजनेच्या माध्यमातून गाय-म्हैस पालन, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन आणि वराहपालन यांसारख्या व्यवसायांना शासनाच्या नियमानुसार अनुदानाचा लाभ मिळणार असून, पशुधनासाठी शेड तसेच आधुनिक चारा व्यवस्थेसारख्या सुविधांनाही प्रोत्साहन मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीसाठी केवळ शेती उत्पादन वाढविणे पुरेसे नसून शेतीशी संबंधित पूरक पूरक व्यवसायांनाही प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. दुग्धव्यवसायातून नियमित उत्पन्न मिळविण्याची संधी उपलब्ध होते, तर शेळी- मेंढी पालन, कुक्कुटपालन आणि इतर पशुपालन व्यवसायांमधूनही शेतकरी कुटुंबांना आर्थिक आधार मिळू शकतो. ग्रामीण भागातील युवकांनी नोकरीच्या शोधात शहरांकडे जाण्याऐवजी गावातच स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी अशा योजनांचा लाभ घेणे गरजेचे आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून पशुपालन व्यवसायाला प्रोत्साहन देणाऱ्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील शेतकरी व युवकांना उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होईल, असे अशोक लोढा यांनी सांगितले



मुलांच्या वाढदिवशी अनाथ चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर फुलवले हास्य



बीड / अंकुश गवळी

वाढदिवस म्हटले की केक, भेटवस्तू आणि आनंदोत्सव मात्र या आनंदाला माणुसकीची आणि सामाजिक बांधिलकीची जोड देत हिंदवी आणि स्वराज यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण शेळके परिवाराने एक अनोखा आणि प्रेरणादायी उपक्रम राबविला. निर्मल बालविकास संस्था, ठाकूर पिंपरी येथील अनाथाश्रमातील चिमुकल्यांना विविध फळांचे वाटप करून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्यात आला.

आपल्या मुलांचा वाढदिवस साजरा करताना समाजातील वंचित आणि अनाथ मुलांचाही विचार व्हावा, त्यांच्या आयुष्यात आनंदाचे काही क्षण निर्माण व्हावेत, या उदात्त भावनेतून हा उपक्रम आयोजित करण्यात आला. चिमुकल्यांना फळांचे वाटप करताना त्यांच्या चेहऱ्यावर उमटलेले निरागस हास्य आणि आनंदाने उपस्थितांचे मन भारावून गेले.

या उपक्रमात निर्मल बालविकास संस्थेच्या संचालिका सौ. गीताताई, हिंदवी-स्वराज यांचे वडील संभाजी शेळके, आई सौ. पूजा शेळके, आजी कुशावती शेळके, मामा गोरख निर्मळ तसेच मित्रपरिवार उपस्थित होता.

संजय घुंडरे-पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

मंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या निर्देशानंतर प्रशासकीय यंत्रणा सक्रिय

आळंदी /प्रतिनिधी

तीर्थक्षेत्र आळंदी येथील एसटी महामंडळाच्या जागेचा योग्य वापर, एसटी स्थानकाची दुरवस्था आणि कायमस्वरूपी एसटी सुविधांचा प्रलंबित प्रश्न अखेर मार्गी लागण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. एसटी महामंडळाच्या मालकीची आळंदी परिसरात मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध असतानाही या जागेचा नियोजनबद्ध वापर होत नसल्याचा मुद्दा सातत्याने उपस्थित केला जात होता. यातील काही जागा पीएमपीएमएलच्या वापरासाठी देण्यात आली असून, उर्वरित जागेचा उपयोग करून एसटी महामंडळाच्या प्रवाशांसाठी कायमस्वरूपी व सक्षम सुविधा निर्माण व्हाव्यात, अशी मागणी होत होती.

या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी संजय घुंडरे-पाटील यांनी अथक प्रयत्न आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा सुरू केला. एसटी स्थानक परिसरात खड्डे पडून दुरवस्था झाल्यानंतर विविध माध्यमांनी या प्रश्नाला वाचा फोडली होती. त्यानंतर या समस्येची गांभीर्याने दखल घेत संजय घुंडरे-पाटील यांनी हा प्रश्न केवळ चर्चेपुरता मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष मार्गी लावण्याचा निर्धार केला. या अनुषंगाने परिवहन राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांची भेट घेऊन प्रश्न मांडण्यात आला. त्यानंतर त्यांनी एसटी महामंडळाच्या संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले. पुढे प्रादेशिक विभागप्रमुख अरुण सिया यांच्या उपस्थितीत एसटी महामंडळाचे अधिकारी, आळंदी नगरपालिका, नगराध्यक्ष, मुख्याधिकारी, झचझड संचालक श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त यांच्या सहभागातून संयुक्त बैठक घेण्यात आली.



यावेळी मुख्याधिकारी श्री माधव खांडेकर, माजी विरोधी पक्षनेते श्री डीडी भोसले-पाटील, श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे विश्वस्त ह.भ.प श्री चैतन्य महाराज कबीर, डढ महामंडळाचे पुणे विभागीय वाहतूक नियंत्रक श्री गोविंद जाधव, श्रीअजित वडगावकर, हभप.श्री बाळासाहेब शेवाळे, श्री दीपक काळे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुरमीकरणाच्या कामाला सुरुवात होणे ही निश्चितच सकारात्मक बाब असली, तरी आळंदीसारख्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या तीर्थक्षेत्रात येणाऱ्या लाखो वारकरी, भाविक, प्रवासी आणि स्थानिक नागरिकांच्या दृष्टीने एसटी स्थानकाचा प्रश्न व्यापक स्वरूपात सोडविणे आवश्यक आहे. उपलब्ध जागेचा योग्य वापर करून कायमस्वरूपी एसटी स्थानक, नियोजनबद्ध बस पार्किंग, प्रवाशांसाठी आवश्यक सुविधा आणि वाहतूक व्यवस्थेचे नियोजन यासाठी परिवहन राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांच्या सहकार्यातून पुढील काळात प्रयत्न करणार असल्याची माहिती श्री संजय घुंडरे-पाटील यांनी यावेळेस दिली.

आ.विजयसिंह पंडित यांच्या नगरसेविका पतीने पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी प्रकरणी सखोल चौकशी करून कारवाईची मागणी-डॉ.गणेश ढवळे

बीड / प्रतिक्रिया

लोकप्रतिनिधींच्या विरोधात बातमी प्रसिद्ध केल्याचा राग मनात धरून साप्ताहिक 'प्रातः विचार'चे संपादक शेख काशेफ अब्दुल हक यांना फोनवरून अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करीत टूकखाली चिरडून मारण्याची धमकी दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. तसेच बीडमधील पत्रकारांविषयी आक्षेपार्ह भाषा वापरत त्यांच्या विरोधात बातम्या प्रसिद्ध करण्याचे धाडस पत्रकारांमध्ये नसल्याची दमबाजी केल्याचा आरोप आहे. या प्रकाराच्या निषेधार्थ सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे महाराष्ट्र राज्य मुख्य प्रचारप्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली गुरुवार, दि. २६ नोव्हेंबर रोजी बशीरगंज चौक येथे निदर्शने करण्यात आली.



यावेळी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा बीडच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि आमदार विजयसिंह पंडित यांना निवेदन देण्यात आले. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी पालकमंत्री बीड सुनेत्रा पवार जागे व्हा, आ.विजयसिंह पंडीत जागे व्हा, पत्रकारांवरील दडपशाहीचा धिक्कार असो अशी घोषणाबाजी करण्यात आली.

यावेळी आंदोलनात साप्ताहिक प्रात:विचारचे संपादक शेख काशेफ,शेख युनुस च-हाटकर, सर्फराज पठाण,मुबीन शेख, रामनाथ खोड, माऊली शिंदे, शेख दानिश ,शेख ईमरान,रामधन जमाले (जिल्हाध्यक्ष इंटक बीड), सामाजिक कार्यकर्ते हनुमान घोडके, प्राचार्य डी.जी.तांदळे, ज्येष्ठ समाजसेवक डॉ.संजय तांदळे, प्रविण आनेराव (जिल्हाध्यक्ष मायक्रो ओबीसी बीड) आदी सहभागी होते.

साप्ताहिक 'प्रातः विचार'चे संपादक शेख काशेफ अब्दुल हक यांनी दि. १८ नोव्हेंबर २०२६ रोजीच्या अंकात 'विजयराजेंना क्रिकेटचा सामना पाहायला वेळ! पण ऊसतोड मजूर आरिफ शेख यांच्या न्यायाच्या मोर्चासाठी वेळ नाही? नगरसेवकांच्या राजकारणात व्यस्त; गरीबांच्या न्यायासाठी मात्र गायब?' या आशयाची बातमी प्रसिद्ध केली होती.

या बातमीच्या अनुषंगाने दि. १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७ वाजण्याच्या सुमारास प्रभाग क्रमांक १७ मधील महिला नगरसेविकेचे पती शेख बिलाल शेख मंजूर यांनी आपल्या मोबाईलवरून संपादक शेख काशेफ यांना फोन केला. आमदार विजयराजे पंडित व नगरसेवकांविरोधात बातमी का प्रसिद्ध केली, असा जाब विचारत टूकखाली मारून टाकण्याची धमकी दिली आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करण्यात आली आहे.

बीडमधील पत्रकारांविषयीही अपशब्द वापरत, माझ्याविरोधात बातम्या प्रसिद्ध करण्याची पत्रकारांमध्ये हिंमत नाही, अशा स्वरूपाची दमबाजी केल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

पत्रकारांनी लोकहिताच्या प्रश्नांवर बातम्या प्रसिद्ध केल्यास त्यांना धमकावणे, शिवीगाळ करणे आणि जीवे मारण्याची भाषा वापरणे हा पत्रकारितेच्या स्वातंत्र्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. पत्रकारांना निर्भयपणे काम करता यावे, यासाठी प्रशासनाने अशा प्रकारांची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. संबंधित प्रकरणातील फोन संभाषण, उपलब्ध पुरावे आणि तक्रारीची पडताळणी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, तसेच संबंधित पत्रकारांना संरक्षण द्यावे अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

आ.विजयसिंह पंडित यांच्या विषयी दैनिकात बातमी प्रसिद्ध केल्यावरून साप्ताहिक प्रांत:विचार चे संपादक शेख काशेफ यांना नगरसेवक पतीने जीवे मारण्याची धमकी देत बीड मधील पत्रकारांबाबत आक्षेपार्ह विधान केल्याने आ.विजयसिंह पंडित यांनी नगरसेवकाला कठोर भाषेत समज द्यावी असे म्हटले आहे.

पान १ वरून

३० नोव्हेंबर रोजी लोकसभा,...

टक्क्यांपर्यंत वाढ करण्यात यावी.

दुसरीकडे, हे कामकाज सुरू होत असतानाच विविध मुद्द्यांवरून विरोधी पक्षांच्या चिंताही समोर येत आहेत. विशेषतः एसआयआर च्या मुद्द्यावरून विरोधी पक्षांकडून संसदेत चर्चेची मागणी केली जाण्याची दाट शक्यता आहे.

'आरोपींना सोडणार नाही, पुणेकरांच्या सुरक्षिततेशी...

शोध सुरू असून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणेने अधिक सतर्क आणि कठोर राहावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांवर कठोर कारवाई करणे, गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींवर लक्ष ठेवणे तसेच शहरातील गर्दीच्या आणि संवेदनशील ठिकाणी पोलीस बंदोबस्त वाढविण्यावर भर दिला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिवाजीनगर कोर्टाबाहेर भरदिवसा हल्ला

बुधवारी (२५ नोव्हेंबर) दुपारी शिवाजीनगर जिल्हा न्यायालयाच्या गेट क्रमांक चारबाहेर मंदार किवळे याच्यावर काही हल्लेखोरांनी

तलाठी विलास तपसे हल्ल्याचा...

येत्या ३० तारखेपासून काम बंद आंदोलन करण्याचा इशारा दिला.

तलाठी हल्ला प्रकरणातील आरोपींविरुद्ध तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली असून प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन कारवाई न केल्यास निवडणूक व नैसर्गिक आपत्तीशी संबंधित कामकाज वगळता इतर सर्व कामकाज बंद ठेवून आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महसूल कर्मचारी संघटनांनी दिला आहे. या आंदोलनात बीड तालुक्यातील सर्व तलाठी, मंडळ अधिकारी व महसूल विभागातील विविध कर्मचारी संघटनांचे पदाधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

नगरपंचायतीच्या अत्याधुनिक टोलेजंग ...

नवनाथराव म्हेत्रे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विकास मुंडे, ज्येष्ठ नेते अंकुशराव शिंदे, गटनेते तथा सभापती अस्लम भैय्या कुरेशी, माजी सरपंच गंपूशेठ पवार, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाध्यक्ष महादेवदादा उजगरे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तसेच या सोहळ्याला नगरपंचायतीचे सर्व सन्माननीय सभापती व नगरसेवक उपस्थित राहणार आहेत. यामध्ये सभापती सौ.रंजना नागनाथ डिगे, सभापती सौ.मिरा सुधीर ढोले, सौ.मिनाक्षी संभाजी शिंदे, सौ.मंगल राजाभाऊ मुंडे, सौ.द्रौपदी भगवान वाघमारे, सचिन शिवराम सानप, सौ.किस्किंदा दिनकरराव आंधळे, गिन्यानदेव वालू राठोड, सौ.महताबी अब्दुलरौफ पठाण, सौ.मिरा भीमराव उजगरे, सौ.नेहा नागेश आळणे, हरिदास किसनराव टकले, सौ.रुपिका विनय नहार, सौ.उषा उत्तम घाडगे, गुरुप्रसाद लक्ष्मणराव माळवदे आणि अरुण सुरेश मुंडे यांचा समावेश आहे. तसेच शहरातील माजी नगरसेवक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातील पदाधिकारी, विविध संस्थांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक आणि शहरवासीय मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी पोपट नानासाहेब निगळ तसेच नगरपंचायतीचे सर्व अधिकारी व कर्मचारी परिश्रम घेत आहेत. तरी या ऐतिहासिक लोकार्पण सोहळ्यास सर्व मान्यवर, नागरिक, हितचिंतक आणि वडवणीकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन नगरपंचायतीच्या वतीने करण्यात आले आहे. शनिवारचा हा दिवस वडवणीकरांसाठी केवळ नव्या इमारतीच्या उदघाटनाचा नसून, शहराच्या प्रशासकीय विकासाला नवी दिशा देणाऱ्या एका महत्त्वपूर्ण पर्वाचा साक्षीदार ठरणार आहे!

वकीलवाडीत नालीअभावी साडपाण्याचा विळखा

केज । प्रतिनिधी

केज शहरातील वॉर्ड क्रमांक ४ मधील वकीलवाडी परिसरात नालीची व्यवस्था नसल्याने येथील रहिवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सांडपाणी थेट नागरिकांच्या प्लॉटमध्ये आणि रस्त्यावर साचत असल्याने परिसरात डासांचा प्रादुर्भाव वाढला असून, त्यामुळे साथीचे व इतर आजार उद्भवण्याचा धोका निर्माण झाला आहे. वारंवार तोंडी सांगून तसेच लेखी अर्ज देऊनही गेल्या दोन वर्षांपासून या समस्येकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

प्रशासनाचे दुर्लक्ष



प्लॉट व रस्त्यावर साचतेय सांडपाणी

वकीलवाडी भागात नाली नसल्यामुळे घरातील आणि परिसरातील सांडपाण्याचा निचरा होत नाही. परिणामी हे सांडपाणी रस्त्यावर आणि मोकळ्या प्लॉटमध्ये साचून राहते. साचलेल्या पाण्यामुळे चिखल आणि घाण पसरत असून, डासांची पैदास मोठ्या प्रमाणात वाढली आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर याचा विपरीत परिणाम होऊन आजार बळावण्याची भीती स्थानिकांकडून व्यक्त केली जात आहे.

दुजाभावाचा आरोप; दोन वर्षांपासून प्रलंबित काम

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, या समस्येबाबत नगर पंचायत प्रशासनाकडे वेळोवेळी तक्रारी करण्यात आल्या आहेत. अर्ज देऊनही दोन वर्षे उलटून गेली तरी अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. इतर काही भागांत मात्र कामांची रेलचेल दिसून येते-दुसऱ्या गल्लीतील नाली दोन वेळा पाडून पुन्हा बांधण्यात आली आणि कानडी रोडही नाली व पाईप लाईनसाठी दोन वेळा तयार करण्यात आला; मात्र वकीलवाडीतील नालीचे काम दोन-तीन वर्षांपासून रखडले असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

तातडीने नाली बांधण्याची मागणी

आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष काम गरजेचे आहे, अशी भावना व्यक्त करत वकीलवाडीतील नागरिकांनी संबंधित प्रशासनाने या प्रश्नाची तातडीने दखल घेऊन नालीचे काम मार्गी लावावे, अशी जोरदार मागणी केली आहे.

केजमध्ये भरणार मराठवाडा विभागीय 'शेतकरी निर्धार बैठक'; ॲड.प्रकाश आंबेडकर करणार मार्गदर्शन

केज । प्रकाश मुंडे

राज्यातील शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकरी कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांना शासन दरबारी वाचा फोडण्यासाठी सोमवार, दिनांक ३० नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजता केज येथील मुक्ताई फंक्शन हॉलमध्ये मराठवाडा विभागीय 'शेतकरी निर्धार बैठकीचे' आयोजन करण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड. बाळासाहेब तथा प्रकाश आंबेडकर या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असून, भाई बाबासाहेब देवकर यांची या वेळी प्रमुख उपस्थिती असणार आहे.

सध्या राज्यातील बळीराजा नैसर्गिक आपत्ती आणि आर्थिक संकटांच्या दुहेरी कात्रीत सापडला आहे. शेतीमालाला मिळणारा कवडीमोल भाव आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी कामगार पक्षाचे राज्य चिटणीस मंडळ सदस्य भाई मोहन गुंड यांनी या महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन केले आहे. बैठकीनंतर ड. बाळासाहेब आंबेडकर यांची पत्रकार परिषद होणार असून, यामध्ये ते शेतकरी आणि कामगारांच्या प्रश्नांवर आपली रोखठोक भूमिका स्पष्ट करणार आहेत.

बैठकीतील प्रमुख मागण्या आणि चर्चेचे मुद्दे: आर्थिक मदत: शेतकऱ्यांची तुटपुंजी ५ हजार रुपयांच्या मदतीवर बोळवण न करता सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये, तर शेतमजूर व कामगारांना प्रत्येकी ३० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी.

कापूस व पाणी प्रश्न: कापूस आयातीवर २० टक्के आयात शुल्क लागू करावे आणि राज्यातील सर्व विभागांना पाण्याचे समन्यायी वाटप करावे. वीज बिल माफी व चारा: दुष्काळजन्य परिस्थिती पाहता शेतीपंपांचे आणि नागरिकांचे घरगुती वीज बिल पूर्णपणे माफ करावे, तसेच जनावरांसाठी तातडीने चारा व पाण्याची व्यवस्था करावी. शक्तिपीठ महामार्ग विरोध: जनतेला नको असलेला शक्तिपीठ महामार्ग तात्काळ रद्द करून त्या भागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना भरीव आर्थिक मदत द्यावी. या निर्धार बैठकीस बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यातील शेती प्रश्नावर काम करणारे सर्व समविचारी शेतकरी प्रतिनिधी, नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजक भाई मोहन गुंड यांनी केले आहे.

बार्टीच्या वतीने संविधान दिन साजरा



अंबाजोगाई(प्रतिनिधी): डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)यांच्या वतीने अंबाजोगाई तालुक्यातील चनई येथे सांडेश्वर मा. विद्यालय व सृजन प्रा. विद्यालय येथे ७७ वा संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी बार्टीचे अंबाजोगाई तालुका समतादूत व्यंकटेश जोशी,विद्यालयाचे मुख्याध्यापक स्वामी,सहशिक्षक प्रदीप चव्हाण, सृजन प्रा.विद्यालयाचे मुख्याध्यापक कांबळे उपस्थित होते

शाळेच्या परिसरातून भव्य प्रभातफेरी काढण्यात आली. या प्रभातफेरीत दोन्ही शाळांतील विद्यार्थी, शिक्षक, समतादूत, पालक, गावातील युवक,गटाचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून तसेच भारतीय संविधान पुस्तिकेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी उपस्थित विद्यार्थी, शिक्षक व मान्यवरांनी सामूहिकरीत्या संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. हा उपक्रम सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय विभागाचे मुख्य सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, बार्टीच्या महासंचालक दीपा मुधोळ-मुंडे, बार्टीचे विभागप्रमुख बबन जोगदंड,समतादूत प्रकल्पाचे बीड जिल्हा प्रकल्प अधिकारी योगेश सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात संविधान दिनानिमित्त व्याख्यान

अंबाजोगाई (प्रतिनिधी): यो.शि.संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयात भारतीय संविधान दिनानिमित्त संविधान कट्ट्यावर राज्यशास्त्र विभागाचे प्रा.रमेश सोनवळकर यांचे 'भारतीय संविधान निर्मितीत महिलांचे योगदान' या विषयावर अभ्यासपूर्ण व्याख्यान झाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर होते.व्यासपीठावर जेष्ठ सल्लागार एम. एस.लोमटे,एन.के. गोळेगांवकर,प्राचार्य डॉ.प्रशांत देशमुख, प्रा.डॉ.शैलजा बरूरे आदी उपस्थित होते.



आपल्या व्याख्यानात प्रा.सोनवळकर यांनी संविधान सभेतील पंधरा महिला सदस्यांच्या योगदानाचा आढावा घेत हंसा मेहता, दक्षायणी वेलायुधन, दुर्गाबाई देशमुख, बेगम ऐजाज रसूल, राजकुमारी अमृत कौर, रेणुका रे, अम्मू स्वामिनाथन आदी महिला सदस्यांनी संविधान निर्मितीच्या प्रक्रियेत बजावलेली भूमिका विशद केली. स्त्री-पुरुष समानता, सामाजिक न्याय, अस्पृश्यता निर्मूलन, धर्मनिरपेक्षता, महिला शिक्षण, आर्थिक अधिकार आणि लोकशाही मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी या महिलांनी केलेले वैचारिक योगदान त्यांनी अधोरेखित केले.अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी संविधान आणि त्यातील मूल्यांची जपणूक करण्याचे आव्हान असल्याचे नमूद करून संविधान आणि त्यातील मूल्ये टिकवून ठेवण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले प्रा.डॉ.सविता बुरांडे यांनी भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन घेतले तर प्रा.अर्चना जोशी यांनी तयार केलेल्या संविधानविषयक कवितांच्या भित्तिपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रशांत देशमुख यांनी केले.

प्रा.डॉ.शैलजा बरूरे संचालन यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शुक्रवार । दिनांक २७ नोव्हेंबर २०२६



सूचना – १) योग्य पर्याय निवडा व गोल करा २) सर्व प्रश्नांसाठी एक वही करा त्यात प्रश्न लिहून काढा ३) प्रश्नमंजुषा कात्रण कट करा जपून ठेवा.

मराठी

1 भारतीय संविधान दिन कोणत्या दिवशी साजरा केला जातो?
- ○ अ) १५ ऑगस्ट
- ○ ब) २६ जानेवारी
- ○ क) २६ नोव्हेंबर
- ○ ड) २ ऑक्टोबर

2 २६/११ चा दहशतवादी हल्ला भारतातील कोणत्या शहरात झाला?
- ○ अ) दिल्ली
- ○ ब) मुंबई
- ○ क) पुणे
- ○ ड) चेन्नई

इंग्रजी

3 Who is known as the chief architect of the Indian Constitution?
- ○ A) Mahatma Gandhi
- ○ B) Dr. B. R. Ambedkar
- ○ C) Jawaharlal Nehru
- ○ D) Sardar Patel

4 In which year did the 26/11 terrorist attack take place?
- ○ A) 2001
- ○ B) 2005
- ○ C) 2008
- ○ D) 2010

गणित

5 भारतीय संविधान तयार करण्यासाठी २ वर्षे ११ माहने १८ दिवस लागले. २ वर्षे म्हणजे ७३० दिवस धरल्यास, ११ माहने ३० दिवसांचे धरून एकूण किती दिवस होतील?
- ○ अ) १०५८
- ○ ब) १०६८
- ○ क) १०७८
- ○ ड) १०८८

6 २६/११ चा हल्ला २६ नोव्हेंबर २००८ रोजी सुरू झाला आणि २१ नोव्हेंबर रोजी संपला. या तारखांमधील फरक किती दिवसांचा आहे?
- ○ अ) २
- ○ ब) ३
- ○ क) ४
- ○ ड) ५

बुद्धीमत्ता

7 संख्या मालिका पूर्ण करा.
२६, ५२, ७८, १०४, ____
- ○ अ) १२०
- ○ ब) १३०
- ○ क) १५६
- ○ ड) १४०

8 २६/११ या संख्येतील अंकांची बेरीज करून त्यास २ ने गुणले तर उत्तर किती येईल?
- ○ अ) १४
- ○ ब) १६
- ○ क) १८
- ○ ड) २०

सामान्यज्ञान

9 मानवी शरीरात रक्त शुद्ध करण्याचे मुख्य कार्य कोणता अवयव करतो?
- ○ अ) हृदय
- ○ ब) फुप्फुसे
- ○ क) मूत्रपिंड
- ○ ड) जठर

10 अग्निशामक यंत्रणामध्ये सामान्यत: कोणता वायू वापरला जातो?
- ○ अ) ऑक्सजन
- ○ ब) हायड्रोजन
- ○ क) कार्बन डायऑक्साइड
- ○ ड) नायट्रोजन



मोरवड ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी कधी होणार?

ग्रामसेवक काशीद यांच्यावर कारवाईची मागणी; ग्रामपंचायत सदस्य कार्तिकेश शेंडगे यांचा आमरण उपोषणाचा इशारा!; वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह; सात दिवसांत चौकशी समिती नेमण्याची मागणी

वडवणी । प्रतिनिधी

मोरवड ग्रामपंचायतीमध्ये बोगस बिले उचलून आर्थिक अनियमितता केल्याचा तसेच विविध विकासकामांमध्ये गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी तक्रार दाखल करून दोन महिने उलटूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप ग्रामपंचायत सदस्य कार्तिकेश महादेव शेंडगे यांनी केला आहे. संबंधित ग्रामसेवक काशीद यांच्यावर कारवाई कधी होणार? असा सवाल उपस्थित करत त्यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली आहे. येत्या सात दिवसांत चौकशी समिती नियुक्त करून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी न केल्यास आमरण उपोषणाला बसण्याचा इशारा शेंडगे यांच्यासह मोरवड ग्रामस्थांनी दिला आहे.

मोरवड ग्रामपंचायतीमध्ये दलित वस्ती सुधार योजना, तांडा वस्ती सुधार योजना, पंधरावा वित्त आयोग आणि ग्रामनिधी या विविध योजनांतर्गत झालेल्या खर्चाची सखोल तपासणी करण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. या योजनांच्या माध्यमातून करण्यात आलेली कामे, त्यासाठी खर्च करण्यात आलेला निधी, प्रत्यक्ष कामाची स्थिती आणि सादर करण्यात आलेली बिले यांची स्वतंत्र चौकशी समितीमार्फत पडताळणी करावी, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य शेंडगे यांनी केली आहे. विशेष म्हणजे, माहिती अधिकारांतर्गत मागणी करूनही मागील दोन महिन्यांपासून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध करून देण्यात आलेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे. लोकप्रतिनिधी म्हणून ग्रामपंचायतीच्या आर्थिक व्यवहारांची माहिती मिळणे हा आपला अधिकार असून, मागणी केलेली संपूर्ण माहिती तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.

सन २०२४-२५ मधील आर्थिक व्यवहारांची तपासणी करा!

ग्रामसेवक काशीद यांच्या कार्यकाळातील सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील सर्व आर्थिक व्यवहारांची तपासणी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यामध्ये विकासकामांची बिले, व्हाउचर, मोजमाप पुस्तिका (एमबी), बँक खात्यांचे व्यवहार, निधी वितरण आणि प्रत्यक्ष झालेल्या कामांची पडताळणी करावी. कागदोपत्री दाखविण्यात आलेली कामे प्रत्यक्षात झाली आहेत का? मंजूर निधीचा विनियोग नियमानुसार झाला आहे का? तसेच बोगस बिले उचलण्यात आली आहेत का? या सर्व बाबींची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी शेंडगे यांनी केली आहे.



वरिष्ठ अधिकारी नेमकी कोणती भूमिका घेणार?

या प्रकरणी तक्रार दाखल होऊन दोन महिने उलटले असतानाही तालुका स्तरावरील वरिष्ठ अधिकारी चौकशी आणि कारवाई करण्यास विलंब का करत आहेत, असा सवाल उपस्थित होत आहे. आता जिल्हा परिषद बीडचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत विभाग) या तक्रारीची दखल घेऊन नेमकी कोणती भूमिका घेतात, याकडे मोरवड ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. ग्रामपंचायतीच्या कारभारातील आर्थिक व्यवहार पारदर्शक असणे आवश्यक आहे. सार्वजनिक निधीच्या खर्चाबाबत संशय निर्माण होत असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर येणे गरजेचे आहे. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांनी या तक्रारीकडे गांभीर्याने लक्ष देऊन चौकशी प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

सात दिवसांचा अल्टिमेटम; अन्यथा आमरण उपोषण!

मोरवड ग्रामपंचायतीतील कथित आर्थिक अनियमिततेची चौकशी करण्यासाठी येत्या सात दिवसांत चौकशी समिती नियुक्त करावी आणि माहिती अधिकारांतर्गत मागितलेली सर्व कागदपत्रे तातडीने उपलब्ध करून द्यावीत. अन्यथा ग्रामपंचायत सदस्य कार्तिकेश महादेव शेंडगे व मोरवड ग्रामस्थांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

आता ग्रामपंचायतीतील कथित गैरव्यवहाराच्या आरोपांची प्रशासन कधी दखल घेणार, चौकशी समिती कधी नियुक्त होणार आणि संबंधितांवर काय कारवाई होणार, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

सामाजिक कार्यकर्ते शामसुंदर वाघमारे यांचे अपघाती निधन

बीड (प्रतिनिधी): वाघीरा ता. पाटोदा येथील सामाजिक कार्यकर्ते शामसुंदर वाघमारे(वय ६५वर्ष) यांचे अपघाती निधन आज दि. २६/११/२०२६रोजी सकाळी १०. ४५वा.एका खाजगी हॉस्पिटल मध्ये झाले.



याबाबत पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार शामसुंदर किसनराव वाघमारे हे दि. १८/११/२०२६ रोजी दुपारचे सुमारास बिडकडून आपले गावी वाघीरा येथे जात होते. ते रोडचे कडेला उभे असताना एका अनोळखी वाहनाने त्यांना जोराची धडक बसल्याने ते रोडवर कोसळले.त्यांचे डोक्याला व छातीला गंभीर मार लागल्याने ते बेशुद्ध पडले. त्यांना तेथुन जाणाऱ्या काही ओळखीच्या लोकांनी मदत करून बीड येथील एका खाजगी दवाखान्यात दाखल केले.उपचारत चालु असताना आज दि. २६/११/२०२६रोजी त्यांची प्राणज्योत मावळली.त्यांचा अंत्यविधी आज सायंकाळी सहा वा.वाघीरा ता.पाटोदा जि.बीड येथे करण्यात आला.त्यांचे निधनाने सर्वत्र दुःख व्यक्त करण्यात येत आहे.त्यांचे पश्चात वडील, पत्नी,सहा मुली,एक मुलगा,तीन जावाई,दोन भाऊ व एक बहीण असा मोठा परिवार आहे.

नागपूर येथे सब-ज्युनिअर राज्यस्तरीय वुशु निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन

बीड (प्रतिनिधी): मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आणि क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने २०२६-२७ या वर्षातील २३ व्या सब-ज्युनिअर राज्यस्तरीय वुशु निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा येत्या दि.३० नोव्हेंबर २०२६ रोजी नागपूर येथील तालुका क्रीडा संकुल, कोराडी येथे पार पडणार आहे. अशी माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी दिली आहे.

सर्व सहभागी संघ, खेळाडू आणि पंचांनी सकाळी ८ वाजेपर्यंत स्पर्धा स्थळी उपस्थित राहणे अनिवार्य आहे. सकाळी ८ ते १० या वेळेत खेळाडूंचे वजन आणि तांत्रिक समितीची बैठक होईल. सकाळी ११ वाजता स्पर्धेचा उद्घाटन सोहळा संपन्न होईल. त्यानंतर सकाळी ११:३० वाजल्यापासून सांडा आणि पारंपरिक कुंग फू या दोन्ही क्रीडा प्रकारांतील प्रत्यक्ष सामन्यांना सुरुवात होईल. सायंकाळी ६ ते ७ या वेळेत बक्षीस वितरण व समारोप सोहळा होऊन सर्व संघ रवाना होतील. या राज्यस्तरीय निवड चाचणीतील प्रत्येक खेळ आणि वजनी गटामध्ये प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंची आगामी २६ व्या राष्ट्रीय सब-ज्युनिअर वुशु (पुरुष व महिला) अजिंक्यपद स्पर्धा २०२६-२७ साठी महाराष्ट्र राज्याच्या अधिकृत संघात निवड केली जाणार आहे. असे कळविले आहे.

रब्बी ज्वारी मिनीकिटसाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावेत!-डॉ.अर्चना नागरगोजे यांचे आवाहन

परळी वैजनाथ(प्रतिनिधी): रब्बी हंगामात ज्वारी पिकाचे क्षेत्र वाढविण्यासह शेतकऱ्यांना सुधारित वाणांच्या बियाण्यांचा लाभ मिळावा, उत्पादनात वाढ व्हावी आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार व्हावा, या उद्देशाने कृषी विभागामार्फत रब्बी ज्वारी मिनीकिट वाटपाचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी परळी वैजनाथ तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारी मिनीकिटसाठी अर्ज करावेत, असे आवाहन परळी वैजनाथ तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे यांनी केले आहे.

रब्बी हंगामात ज्वारी हे महत्त्वाचे पीक असून मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या शेती अर्थव्यवस्थेत ज्वारी पिकाला विशेष महत्त्व आहे. ज्वारीपासून धान्याबरोबरच जनावरांसाठी पौष्टिक चारा उपलब्ध होतो. सध्या बदलत्या हवामानाचा आणि अनियमित पावसाचा शेतीवर परिणाम होत असून अशा परिस्थितीत कमी पाण्यात येणाऱ्या आणि प्रतिकूल परिस्थितीला तुलनेने तोंड देऊ शकणाऱ्या पिकांकडे शेतकऱ्यांनी लक्ष देणे आवश्यक आहे. ज्वारी पिकाच्या सुधारित वाणांचा वापर केल्यास उत्पादनवाढीस मदत होऊ शकते.कृषी विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या रब्बी ज्वारी मिनीकिट उपक्रमामुळे शेतकऱ्यांना सुधारित बियाण्यांचा लाभ घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या उपक्रमाची माहिती घेऊन विहित पद्धतीने अर्ज सादर करावेत. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे जोडून संबंधित कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.रब्बी ज्वारी मिनीकिटसाठी अर्ज करण्याची प्रक्रिया, पात्रतेचे निकष, आवश्यक कागदपत्रे, बियाण्यांचे प्रमाण आणि वितरणाबाबतची माहिती संबंधित कृषी सहाय्यक किंवा कृषी कार्यालयातून प्राप्त करून घ्यावी. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत आणि योजनेच्या उपलब्ध उद्दिष्टाबाबतही कृषी विभागाकडून माहिती घ्यावी. तालुक्यातील जास्तीत जास्त पात्र शेतकऱ्यांनी रब्बी ज्वारी मिनीकिट उपक्रमाचा लाभ घ्यावा. सुधारित बियाण्यांचा वापर करून ज्वारी पिकाचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना नागरगोजे यांनी केले आहे.







Dainik Dongarcha Raja Newspaper Published and Owned by **Anil Shriram Waghmare** and Printed at **Balasaheb jijaram kadbane, Shri Jagmitra Printers & Sales Corporation,** Sumati Nagar, Jalna road, Beed, Dist - Beed Pin- 431122 (Maharashtra) and published at Dongarcha raja, Main Road, wadvani, Tq.Wadvani, District Beed. 431144 (Maharashtra) **Editor : Anil Shriram Waghmare**

दैनिक डोंगरचा राजा हे पत्र मालक, प्रकाशक अनिल श्रीराम वाघमारे यांनी मुद्रक बालासाहेब जिजाराम कडबाने यांच्या श्री जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कार्पोरेशन, सुमतीनगर, जालना रोड, बीड जि.बीड - पिन- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून डोंगरचा राजा कार्यालय,मेन रोड, वडवणी, ता.वडवणी जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. फोन - ९४२२५९१८०५, निवासी संपादक: डॉ.एल.बी.वाघमारे, संपादक- अनिल श्रीराम वाघमारे (या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)